क्रमांक/यजिप/साप्रवि/परिषद/१८०४/१४
यवतमाळ जिल्हा परिषद, यवतमाळ
(सामान्य प्रशासन विभाग)
यवतमाळ, दिनांक :- २४.०७.२०१४

**प्रति,**

**सन्मा. श्री / श्रीमती -----------------------------------------**

**सदस्य, स्थायी समिती, जिल्हा परिषद, यवतमाळ**
**मुक्काम --------------------- पोष्ट -------------------**
**तालुका --------------------- जिल्हा: यवतमाळ.**

**मार्फत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती -----------------------**

****

दिनांक ०९.०७.२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचा अहवाल आपले माहिती करिता या सोबत पाठविण्यात येत आहे.

**सहपत्र :-** वरीलप्रमाणे.

**सचिव,**
**स्थायी समिती**
**जिल्हा परिषद, यवतमाळ.**

**प्रतिलीपी :-**

१] मा.नामदार श्री. ---------------------------------------------------- ------------------------------------------- महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहीतीस्तव सविनय सादर.

२] मा. श्री. ------------------------------------- खासदार / आमदार.
मुक्काम --------------------
पोष्ट -------------- तालुका -------------------जिल्हा-------------------- यांना माहितीस्तव सविनय सादर.

३] मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, / मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांना माहितीस्तव सादर.

४] मा. प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. यवतमाळ यांना माहीती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता.

५] ---------------------------------------- जि. प. यवतमाळ (सर्व खातेप्रमुख) यांना माहिती तथा पुढील योग्य कार्यवाहीस्तव रवाना. आपले विभागाशी संबंधीत असलेले विषय, चर्चा व सुचना यावर नियमानुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल मा.अध्यक्ष, व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे स्वतंत्ररित्या त्वरीत सादर करण्याची दक्षता घ्यावी. तसेच अनुपालन अहवालाच्या २५ प्रती (विहीत प्रपत्रात) तात्काळ सा.प्र.वि.च्या परिषद विभागाकडे सादर कराव्या.

****

## दिनांक ०९.०७.१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

दिनांक ०९. ०७ . १४ रोजी स्थायी समितीचे सभापती मा. श्री. प्रविण विनायकराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली २. ०० वाजता घेण्यात आली. सभेला जि. प.चे खालील सन्मा.पदाधिकारी, सन्मा. स्थायी समिती सदस्य, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी , मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी , खाते प्रमुख, व आमंत्रीत अधिकारी उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| श्री.प्रविण विनायकराव देशमुख | सभापती, स्थायी समिती | श्री.ययाती मनोहरराव नाईक | उपाध्यक्ष, जि.प.यवतमाळ |
| श्री.सुभाष मधुकरराव ठोकळ | सभापती, अर्थ व बांध.स. | श्री.मनमोहनसिंग अमरसिंग चव्हाण | सभापती,शिक्षण व आ.स. |
| श्री.प्रभाकर राघोजी उईके | सभापती स.क.स. | सौ.प्राजक्ताताई निमीष मानकर | सभापती,म.व बा.क.स. |
| श्री. राहुल मा. ठाकरे | सदस्य | श्री. देवानंद न. पवार | सदस्य |
| श्री.अनिल भ. नरवाडे | सदस्य | - | - |
| सौ.संगीताताई अ. राजुरकर | सदस्य | सौ. उमाताई विजय पिंदुरकर | सदस्य |
| श्री. दिवाकर धनु राठोड | सदस्य | - | - |
| **आमंत्रीत अधिकारी** | | | |
| डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी | मुख्य कार्यकारी अधिकारी | डॉ. शरद कुलकर्णी | अति.मु.का.अ. |
| श्री.अरुण मोहोड | उप मु.का.अ.(सा.) | डॉ. प्रशांत रुमाले | उप मु.का.अ.(पंचा.) |
| श्री.व्ही.के.मरसाळे | उप मु. का. अ.(म.व.बा.क.) | सौ.ज्योती भोंडे,व.ले.अ. (प्रतिनिधी) | मु.ले.व वि.अ. |
| श्री. एस.एस.तपासे, | का.अ.बांधकाम क्र.१ | श्री. ए.एम.नितनवरे | का.अ.बांधकाम क्र.२ |
| श्री. शि.वा.वड्डेवार | कार्य.अभि.(सिंचन) | श्री. के.टी उमाळकर | का.अ.(पा.पु.) |
| डॉ. के.झेड. राठोड | जि.आ.अ. | डॉ. श्री.दिलीप सोनकुसरे | जि.पशु संवर्धन अधि. |
| श्री. पी.पी.देशपांडे | उप अभि. (यां.)भु.स.वि.य. | श्री.जे.आर.राठोड, | कृषि विकास अधिकारी |
| सौ. सुचिता पाटेकर | शि.अ. (प्राथ.) जि.प. यवत. | श्री.एस.जी.वसावे | शि.अ.(माध्य.) |
| श्री. एम.एम. गवई | स.ले.अ. , स.क.स. | श्री.व्ही.जे.वालदे | व. भू.वै.भू.स.वि.यं.यवतमाळ |
| श्री.अ.वि.सुने (प्रतिनिधी) | जि.ग्रा.वि.अ.यवतमाळ | श्री. ली.रा. वाघमारे | उप अभि. जि.प. उपवि. |
| श्री. व्ही.एच.गावंडे (प्रति.) | का.अ.म.जि.प्रा.यवतमाळ | श्री.मनोजर निरंजने (प्रतिनिधी) | उपसंचालक सा.वनि.वि. |
| श्री. अमित एम. आडे | उप.का.अ.(पा.पु) | श्री.आर.आर. खरोडे | वि.अ.(पंचा.) |
| श्री.अ.ना.निसाळ | उप.का.अ.(सिंचन) | श्री.डी.जे.पाली | शा.अ.(सिंचन) |
| श्री. व्ही.एम.केंडे | शा.अ.भु.स.वि.यं. | श्री.प्र.रा. परळीकर (प्रतिनिधी) | का.अ.पं.प्र.ग्रा.स.यो. |
| श्री. विजय पारवानी | स्विय सहा. मु.का.अ. | श्री.भानुदास चरडे | स्विय सहा.उप.मु.का.अ.(सा.) |
| श्री. पी.के.भोंग | स्वि.सहा.मा.अध्यक्ष,जि.प | श्री.संजय वानखडे | कृ.अ. (नरेगा) |
| श्री.एन.पी.कोडगीरवार | क.प्र.अ. सा.प्र.वि. | श्री.पवन आत्राम | स्वि.स.सभा.स.क. स. |
| श्री. राजेंद्र कठाळे | क.स. शि. (प्राथ) | श्री.एच.आर.मोदानी | स.ले.अ.वित्त विभाग |
| श्री.श्रीकांत मडावी | कनि.सहा.सा.प्र.वि. | श्री.व्ही.पी.चहाकार | आरोग्य सहा.जि.आ.अ. |

सर्वप्रथम सचिवांनी मा.पदाधिकारी व सन्मा.स्थायी समिती सदस्यांचे स्वागत करुन मा.अध्यक्ष स्थायी समिती यांचे पुर्वपरवानगीने सभेचे कामकाज सुरु करण्यापुर्वी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व सभागृहातील जेष्ठ नेते श्री. रामजी आडे यांचे आजाराने दुःखद निधन झाल्यामुळे त्यांना दोन मिनिटे उभे राहुन सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पन करण्यात आली. त्यानंतर सभेचे पुढील कामकाज सुरुवात करण्यात आले.

**सन्मा.जि.प. सदस्य श्री. देवानंद न.पवार** - यांनी धडक सिंचन योजनेतील विहीरी बांधकामाकरिता एक वर्षासाठी मुदतवाढ मिळणेसाठी शासनास ठरावाव्दारे विनंती करण्यात यावी असे सांगीतले. त्यावर **मा. अध्यक्ष** यांनी पावसाळा सुरु होऊनही पाणी न आल्यामुळे व पावसाच्या लहरीपणामुळे शेतकरी अत्यंत अडचणीत सापडलेला आहे. धडक सिंचन योजनेमधील विहीरी शेतीचे उत्पन्न वाढण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असुन यामुळे शेतीच्या उत्पन्नात निश्चीतच वाढ होईल. परंतु आजच्या आर्थिक परिस्थितीमुळे व पावसाळा सुरु होणार असल्याने शेतकरी या विहीरी पुर्ण करु शकत नाही. तसेच जर पावसाळ्या मध्ये विहीरी पुर्ण केल्या तर त्या खचु शकते व पर्यायाने शेतक-याचे आर्थिक नुकसान होऊ शकते त्यामुळे धडक सिंचन विहीरी करिता दिनांक ३१ जुलै २०१४ पर्यंत दिलेल्या मुदतीत वाढ करुन सदरची मुदत एक वर्षासाठी देण्यात यावी याबाबत ठरावाव्दारे शासनास विनंती करण्या करिता खालीलप्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र. १ :-** **सर्वप्रथम टंचाईवरील सर्व उपाययोजनांना ३१ जुलै २०१४ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतल्याबाबत शासनाचे अभिनंदन करण्यात येत आहे. तसेच धडक सिंचन योजनेमधील विहीरी, शेतीचे उत्पन्न वाढण्यासाठी अत्यंत महत्वाच्या असुन यामुळे शेतीच्या उत्पन्नात निश्चीतच वाढ होईल. परंतु आजच्या आर्थिक परिस्थितीमुळे व पावसाळा सुरु होणार असल्याने शेतकरी सदहु विहीरीचे बांधकाम पुर्ण करु शकत नाही. तसेच जर पावसाळ्या मध्ये विहीरी पुर्ण केल्या तर त्या खचु शकते व पर्यायाने शेतक-याचे आर्थिक नुकसान होऊ शकते त्यामुळे धडक सिंचन विहीरी करिता जुलै २०१४ पर्यंत दिलेल्या मुदतीत वाढ करुन एक वर्षासाठी मुदतवाढ देण्यात यावी अशी ही सभा ठरावाव्दारे शासनास विनंती करते.**

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**
**ठरावाचे अनुषंगाने पुढील कार्यवाही का.अ.(सिंचन ) यांनी करण्याबाबत ही सभा निर्देश देते.**

**सन्मा जि.प. सदस्य श्री. देवानंद न.पवार** - यांनीदिनांक २ जुलै २०१४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाचे बैठकीमध्ये ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या अनुषंगाने घेतलेल्या निर्णयाबाबत अभिनंदनाचा ठराव घेऊन शासनास सादर करण्यात यावा असे सांगीतले. त्यावर **मा. अध्यक्ष** यांनी ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी असलेली १०% लोकवर्गणीची अट पुर्णतः रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला असुन ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणी प्रक्रीयेत देखील सुधारणा करणेबाबतचा निर्णय दिनांक २ जुलै २०१४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाचे बैठकीमध्ये घेण्यात आला. करिता मा.श्री. अजित अनंतराव पवार, उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, व मा. श्री. दिलीप सोपल तसेच महाराष्ट्र शासनाचे अभिनंदनाचा ठराव खालीलप्रमाणे सभेत मांडला.

**ठराव क्र. २ :-** **ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी असलेली १०% लोकवर्गणीची अट पुर्णतः रद्द करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला. तसेच ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणी प्रक्रीयेत देखील सुधारणा करण्यात आली असुन तांत्रिक मान्यता आणि प्रशासकीय मान्यतेच्या अधिकारात देखील काही बदल करण्याबाबतचा निर्णय दिनांक २ जुलै २०१४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाचे बैठकीमध्ये घेतल्याने मा.श्री.अजित अनंतराव पवार, उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, व मा. श्री. दिलीप सोपल, व महाराष्ट्र शासनाचे ही सभा ठरावाव्दारे अभिनंदन करते.**

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**
**ठरावाचे अनुषंगाने पुढील कार्यवाही का.अ.(पा.पु. ) यांनी करण्याबाबत ही सभा निर्देश देते.**

**मा. सभापती श्री. सुभाष म. ठोकळ (अर्थ व बांध. समिती ) व मा. सभापती श्री. मनमोहनसिंग अ. चव्हाण (शिक्षण व आरोग्य समिती)**:- यांनी पावसाच्या लहरीपणामुळे दुबार,तिबार पेरणीमुळे निर्माण झालेल्या दुष्काळ सदृष्य परिस्थितीमुळे हवालदिल झालेल्या शेतक-यांना राज्य शासन व केंद्र शासनाकडुन आर्थिक मदत जाहीर करण्यात यावी

तसेच आधिच आत्महत्येबाबत प्रसिध्द असलेल्या आपल्या जिल्हयात आत्महत्येचे प्रमाण वाढु नये आणि शेतकरी पुन्हा स्वतः ला स्थापीत करुन घेण्यासाठी त्याला आर्थिक मदतीची आवश्यकता आहे. तरी शेतक-यांना बी-बीयाने व खते उपलब्ध करुन दयावी तसेच गुरांच्या करिता छावणी उभारण्यात याव्यात व गुरांना वेळेवर चारा उपलब्ध होण्यासाठी चारा डेपोची व्यवस्था करण्यात यावी. त्याचप्रमाणे शेतक-यांना तात्काळ आर्थीक मदत जाहीर करावी अशी मागणी करणारा ठराव आजचे सभेमध्ये मंजुर करुन शासनाकडे सादर करण्यात यावा असे सांगीतले. सदर विषयावर चर्चा होऊन **मा. अध्यक्ष** यांनी खालीलप्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्रं.३-** **पावसाच्या लहरीपणाने शेतक-यांवर दुबार, तिबार पेरणी करावी लागल्याने निर्माण झालेल्या दुष्काळ सदृष्य परिस्थितीमुळे हवादिल झालेल्या शेतक-यांचे आत्महत्येचे प्रमाण वाढु नये आणि शेतकरी पुन्हा स्वतः ला स्थापीत करुन घेण्यासाठी शेतक-यांना बी-बीयाने व खते उपलब्ध करुन द्यावी. तसेच गुरांच्या करिता छावणी उभारण्यात याव्यात व गुरांना वेळेवर चारा उपलब्ध होण्यासाठी चारा डेपोची व्यवस्था करण्यात यावी. त्याचप्रमाणे शेतक-यांना आर्थिक मदतीची आवश्यकता आहे. तरी केन्द्र शासनाने व राज्य शासनाने शेतक-यांना तात्काळ आर्थीक मदत जाहीर करावी अशी ही सभा ठरावाव्दारे केंद्र व राज्य शासनास विनंती करते.**
**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**ठरावाचे अनुषंगाने पुढील कार्यवाही कृषि विकास अधिकारी यांनी करण्याबाबत ही सभा निर्देश देते.**

**विषय क्र. १ :- दिनांक १३/६/२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेच्या अहवालास मंजुरी देणे.**

**सन्मा सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी मागील सभेत जि.प.प्रशासकीय परिसरात असलेल्या अनाधिकृत कँटीन चे अतिक्रमण काढणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर कार्य अभि. बांध क्र.१ यांनी सदहुं प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे सांगीतले. त्यावर मा.सभापती (बांध व अर्थ) यांनी अतिक्रमण काढणे बाबतची कार्यवाही करण्यात यावी असे का.अ.बांध क्र.१ यांना सुचविले. **यावर मा. सभापती (स्थायी समिती ) तथा अध्यक्ष जि.प. यवतमाळ** यांनी उक्त प्रकरणात कोर्टाने १४/७/२०१४ ही तारीख दिलेली असल्यामुळे सदहुं तारीख झाल्यावर बांधकाम विभागाने अतिक्रमण हटविणेबाबतची कार्यवाही करण्याबाबतचे **निर्देश का.अ.बांध.क्र.१** यांना दिले.

**सन्मा. सदस्य सौ. उमाताई वि. पिदुरकर** यांनी मागील सभेत मौजे शिंदोला ता.वणी शाळा निर्लेखन बाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर शि.अ.(प्राथ.) यांनी शाळा व्यवस्थापन समितीकडून अद्याप प्रस्ताव प्राप्तझालेला नसल्याचे सांगीतले. त्यावर **मा. सभापती (स्थायी समिती ) तथा अध्यक्ष जि.प. यवतमाळ** यांनी उक्त विषयावर वारंवार हा विषय सभेमध्ये उपस्थित होत असल्यामुळे निर्लेखनाचा प्रस्ताव त्वरीत पाठविण्याबाबत सबंधितांना कळविण्यात यावे असे **निर्देश शि.अ.(प्राथ.) यांना दिले.**

**मा.उपाध्यक्ष** श्री. ययाती म. नाईक यांनी मागील सभेत पुसद तालुक्यातील प्रसुतीगृह बांधकामे अर्धवट असल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर का.अ.बांध. क्र.२ यांनी एकुण सात प्रसुतीगृहाच्या अपुर्ण कामापैकी जवळा, रोहडा, पारध, सावरगाव (गोरे) येथील कामे सुरु केली असुन पांढुर्णा व बान्सी येथील कामाची प्राकलणे जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडे सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केली आहे. गहूली प्रसुतीगृहाचे काम सुरु व्हावयाचे आहे असे सांगीतले.

**मा.सभापती श्री. प्रभाकर रा. उईके (स.क.स)** यांनी मागील सभेत मौजे बेचखेडा ता. यवतमाळ या ठीकाणी म.ग्रा.रो.ह.यो अंतर्गत वृक्ष लागवडीमध्ये झालेल्या भष्ट्राचाराची चौकशी करण्यात यावी या बाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचा.) यांनी उक्त प्रकरणी चौकशी अहवाल प्राप्त झाला असुन अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल असे सांगीतले. तसेच वणी पंचायत समिती कडील वृक्ष लागवड ची माहिती पाठविणेबाबत सबंधित ग.वि.अ.यांना कळविण्यात आले असल्याचे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. अनिल भ. नरवाडे** यांनी मागील सभेत पाणी टंचाई च्या मागील वर्षाच्या कृती आराखडयामध्ये मंजुर असलेले बोअर का घेण्यात आले नाही या बाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर उप अभियंता यांनी २ बोअर फिजीबल नाही. व करंजी येथिल १ बोअर करण्याची आवश्यकता नसल्याचे भूवैज्ञानिक यांनी कळविले असल्याचे सांगीतले.

**सन्मा सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी सन २०११-२०१२ मध्ये जिल्हा नियोजन समिती मधुन शाळा दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेला ५ लाख रु. मिळाले होते परंतु, बांधकाम विभागाने काम न झाल्यामुळे व रुपये पाच लाख कमी आहे या कारणामुळे सदहुं निधी शासनाकडे परत पाठविला असल्याचे सांगीतले. त्यावर **मा. सभापती (स्थायी समिती )**

**तथा अध्यक्ष जि.प. यवतमाळ** यांनी उक्त प्रकरणी दोषी अधिका-यांवर कार्यवाही करण्यात यावी असे मा. अति. मु.का.अ. यांना सुचित करुन या वर्षी प्राप्त झालेला निधी खर्च होण्यासाठी मुदतवाढीची मागणी करावी.

**सन्मा. सदस्य सौ. उमाताई वि. पिदुरकर** यांनी खनिज विकास नळ योजने अंतर्गत मौजे सावंगी या ठीकाणी सुरु असलेली नळयोजना बंद असल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर **मा. सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष जि.प. यवतमाळ** यांनी बोअर मधून पाणी टाकीत सोडण्यासाठी लागणा-या खर्चाकरिता खनिज विकास मधून निधी लवकर मिळणार नाही. त्यामुळे राष्ट्रीय पेयजल मधून सदर योजना पूर्ण करणे हाच एक विकल्प असल्याचे का.अ.(पा.पु.) यांना सांगीतले.

**सन्मा. सदस्य सौ. उमाताई वि. पिदुरकर** यांनी मागील सभेत मौजे तरोडा, पुनवट या ठीकाणी अकृषक परवानगी नसतांना ग्रामपंचायतीने बीअरबार करिता परवानगी दिलेबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी गट विकास अधिकारी यांचे अहवालानुसार सदर बीअरबारला ग्रामपंचायतीकडून परवानगी देण्यात आली नसुन उप विभागीय अधिकारी यांचेकडुन परवानगी देण्यात आली असल्याचे सांगीतले. तसेच मौजे पुनवटबाबत ग.वि.अ. यांचेकडून अहवाल मागविण्यात आला असुन त्या ठिकाणी खानावळला परवानगी दिली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्याचप्रमाणे मौजे तरोडा येथे खानावळ सुरू आहे व त्याला एस.डी.ओ. च्या अकृषिक परवानगी अन्वये बांधकामाची परवानगी देण्यात आली आहे असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी मागील सभेत पाणी टंचाई चा आराखडा तयार करतांना जि.प.सदस्यांना विश्वासात घेतले जात नाही तसेच ग.वि.अ. यांनी माहितीसुध्दा दिली नसल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर का.अ.(पा.पु.) यांनी सर्व मा.आमदार, सन्मा. जि. प सदस्यांना माहिती देऊनच पाणी टंचाईचा कृती आराखडा सादर केला जातो असे सांगुन यापुढे सर्व पंचायत समितींना सूचना दिल्या जातील असे सांगीतले.

**सन्मा सदस्य सौ. संगीताताई अ. राजूरकर** यांनी वणी तालुक्यातील मौजे निंबाळा पाणी पुरवठयाचे काम करण्यात आले नाही. तसेच या वर्षीच्या एस्टीमेट मध्ये देखील सदहं काम दर्शविण्यात आले नसल्याचे सांगीतले. त्यावर **मा. सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष जि.प. यवतमाळ** यांनी सदरचे काम यावर्षी राष्ट्रीय पेयजल मध्ये घेण्यात यावे असे सांगुन काम न केल्यामुळे सबंधित ग.वि.अ.कडून खुलासा मागविण्याबाबतचे **निर्देश का.अ.(पा.पु.) यांना दिले.**

**सन्मा. सदस्य श्री. अमन ह. गावंडे** यांनी मागील सभेत अनुसूचित जातीमध्ये केंद्रप्रमुखाच्या झालेल्या पदोन्नतीबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर शि.अ.(प्राथ.) यांनी ३ पदे आहेत, २ भरलेली आहेत, व एक रिक्त असुन हिंदू बी.एड् ला मान्यतानाही, त्यामुळे त्यांना देता येत नसल्याचे सांगीतले.

**सन्मा सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी मागील सभेत जि.प. स्तरावर किती चौकशी समित्या कार्यान्वीत आहे याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर मा.उप मुकाअ (सा) यांनी जि.प. स्तरावर दोन चौकशी समित्या गठीत करण्यात आल्या होत्या असे सांगुन एका चौकशी समितीचे अहवालानुसार तत्का. स.क.अधिकारी यांचे विरुध्द पुढील कार्यवाही करण्याकरिता १ ते ४ चा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे असे सांगीतले. तसेच दुस-या चौकशी प्रकरणात मा.उप जिल्हाधिकारी (म.ग्रा.रो.ह.यो.) यांचे निर्देशानुसार तहसिलदार घाटंजी यांचे कडुन चौकशी करण्यात आली असुन चौकशी अहवालाच्या अनुषंगाने सबंधितावर पुढील कार्यवाही करण्याकरिता मा. आयुक्त, अमरावती विभाग अमरावती यांना प्रस्ताव सादर करण्यात आला असुन त्याची प्रत शासनास सादर करण्यात आली असल्याचे सांगीतले.

**सन्मा सदस्य सौ. संगीताताई अ. राजूरकर** यांनी मागील सभेत वणी तालुक्यातील मौजा वेळाबाई येथील सचिवाने ग्रा.प. सदस्यांना विश्वासात न घेता बिअरबार करिता एनओसी दिल्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर उप मु.का.अ.(पं) यांनी उक्त प्रकरणात दिनांक ५ जुलै २०१४ च्या आदेशान्वये सबंधित ग्रामसेवकास निलंबित करण्यात आले असल्याचे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री.अनिल भ. नरवाडे** यांनी मागिल सभेत जि. प.अंतर्गत ५४ ठिकाणी सोलर हातपंप बसविण्यात आले असुन त्यापैकी किती हातपंप सुरु स्थितीत व किती हातपंप बंद आहे या बाबतची माहीती पुरविण्यात यावी असा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर उपअभियंता भु.स.वि.यं. यांनी जिल्हयतील ५४ सोलर हात पंप सुरु असल्याची माहिती विभागाकडून देण्यात आली आहे असे सांगुन मौजे अंबोडा, बारा, चिंचपोड, झरी येथील हात पंप बंद असल्याचे सांगीतले. त्याचप्रमाणे सन्मा. सदस्यांना सोलरपंपाबाबत यादी पुरविण्यात आली आहे असे सांगीतले.

दिनांक १३.०६.२०१४ रोजी झालेल्या स्थायी समितीसभेच्या अहवालातील पुष्ठ क्र.९ मधील परिच्छेद क्र तिन मध्ये सन्मा.सदस्य सौ.संगीताताई अ. राजुरकर यांनी जि.प. शाळा मोहदा येथील आकस्मीक पावसामुळे शाळेच्या ३ खोल्यांचे छप्पर उडुन गेल्याबाबतचा अहवालानुसार काय कार्यवाही करण्यात आली आहे याची विचारणा केली असता कक्ष अधिकारी शि.अ.(प्राथ.) यांनी छप्पर दुरुस्ती करिता रु. ९,९०,०००/- लागणार असल्याचे नमुद असुन त्या ऐवजी शाळेचे छप्पर दुरूस्ती करिता रु.१,९०,०००/- असे वाचावे. व तशी दुरुस्ती करण्यात यावी याबाबतचे निर्देश **मा. सभापती(स्थायी समिती) तथा अध्यक्ष जि.प. यवतमाळ** यांनी सचिवास दिले.

**ठराव क्र. ४ :-** **दिनांक १३.०६.२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेच्या अहवालास दुरुस्तीसह ही सभा मंजुरी प्रदान करते.**

**विषय क्र २ :-** **शासन आदेश व परिपत्रकाचे वाचन करणे.**

**१.**उप मु.का.अ.(पंचा.) यांनी ग्रामसभेमध्ये आरोग्यविषयक जनजागृती होण्यासाठी आरोग्याबाबतचे म.शा. ग्रा.वि. व जलसंधारण विभाग मुंबई,शा.परि.क्र. व्हीपीएम-२०१४ /प्र.क्र.८०/ पंरा-३, दिनांक २६ जुन २०१४ चे वाचन केले.

**२.** का.अ.(पा.पु.) यांनी राज्यातील ग्रामीण भागातील पाणी व्यवस्थापनामधील पाणी साठवा गांव वाचवा अभियानांतर्गत ग्रामपंचायतींचा सहभाग बाबत म.शा. ग्रा.वि.वि.शा.नि.क्र.संकीर्ण -२०१४/ प्र.क्र.१०/ योजना-३ दिनांक २९ मे चे वाचन केले.

**३.** जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी राष्ट्रीय पशुधन अभियान योजनेअंतर्गत विविध योजनांचे प्रस्ताव सादर करणेबाबत आयुक्त पुशसंवर्धन म.रा.पुणे-७ यांचे पत्र दिनांक २४.०६.२०१४ चे पत्राचे वाचन केले.

**विषय क्र ३ :-** **जिल्हा नियोजन समिती अंतर्गत जि.प.प्राथमिक शाळा इमारतीच्या बांधकामासाठी विशेष दुरुस्तीच्या कामाच्या खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

विषयाची माहीती शि.अ. प्राथ यांनी सभेत दिली. जिल्हा नियोजन समिती अंतर्गत जि.प. प्राथ. शाळांच्या विशेष दुरुस्ती करिता मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यवतमाळ यांचे निधी वितरण आदेश क्र. जिवायो/ सर्वसायो/निधी/२०१३-१४ दिनांक १.३.२०१४ अन्वये रु.५०,००,०००/- (पन्नास लक्ष) इतके अनुदान प्राप्त झाले आहे.

सदर अनुदान सन २०१४-१५ च्या आर्थीक वर्षात शाळा दुरुस्तीकरिता खर्च करावयाचे आहे. सदर खर्च अनुदान करण्याकरिता शाळेच्या देखभाल दुरुस्तीचे प्रस्ताव येणे सुरु असुन प्राकलनाची कार्यवाही सुरु आहे.

ग्रामविकास व जलसंधारण विभाग शा.नि.कं.झेडपीए/२०१२/प्र.क्र.६८०/वित्त-९ दिनांक १९ मार्च २०१२ चे शासन निर्णयानुसार खर्चास मान्यता देण्याचे अधिकार जि.प.स्थायी समिती सभेला रु. २५,००,०००/- ते ५०,००,०००/- असल्याने सदहुं विषयास प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी व खर्चास मंजुरात प्राप्त होण्याकरिता सदर विषय स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे. कृपया विषयास मंजुरात प्रदान करण्यात यावी ही विनंती. सदर विषयावर चर्चा होऊन **मा. सभापती (स्थायी समिती ) तथा अध्यक्ष जि.प. यवतमाळ** यांनी खालीलप्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्रं. ५-** **ग्रामविकास व जलसंधारण विभाग शा.नि.कं.झेडपीए/२०१२/प्र.क्र.६८०/वित्त-९ दिनांक १९ मार्च २०१२ चे शासन निर्णयानुसार जिल्हा नियोजन समिती अंतर्गत सन २०१४-१५ या आर्थीक वर्षात जिप.प्राथमिक शाळा इमारतींच्या बांधकामासाठी विशेष दुरुस्तीकरिता रु ५०,००,०००/- चे खर्चास व विषयास प्रशासकीय मान्यता प्रदान करते.**

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्रं.४-** **जलसंपदा विभागाची सन २०११ -१२ ची सामाईक दरसुची मध्ये ११% वाढ करून सामाईक दरसुची सन- २०१३ - १४ ची दिनांक १.४.२०१४ पासुन लागु करणेस मंजुरात मिळणे बाबत.**

विषयाची माहिती कार्यकारी अभियंता (सिंचन) जि. प. यवतमाळ यांनी सभेत दिली. शासनाचे पत्र क्र./दरसुची/२२१२/३४३/१२/लपा-२ जलसंपदा विभाग मंत्रालय मुंबई दि.८.५.२०१४ नुसार सामाईक दरसुची सन २०१३-१४ ही सामाईक दरसुची सन-२०११-१२ मध्ये ११% वाढ करून १.४.२०१४ पासुन अमलात येईल या आशयाचे पत्र अधिक्षक अभियंता लघु सिंचन जलसंधारण मंडळ अमरावती यांचे पत्र क्र.२१४०/दि.२१.५.२०१४ अन्वये या विभागास प्राप्त झाले आहे.

सदर दरवाढ १.४.२०१४ पासुन जिल्हा परीषद सिंचन विभागाच्या कामा करीता लागु करण्या करीता स्थाई समितीची मंजुरी आवश्यक असल्यामुळे मंजुरात प्रदान करण्याकरीता विनंती करण्यात येत आहे. सदर विषयावर चर्चा होउन **मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष, जि.प.यवतमाळ** यांनी खालील प्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्रं.६-** **कार्यकारी अभियंता (सिंचन) जि. प. यवतमाळ यांनी प्रस्तावित केल्यानुसार जलसंपदा विभागाची सन २०११ -१२ ची सामाईक दरसुची मध्ये ११% वाढ करून सामाईकदरसुची सन- २०१३ - १४ ची दिनांक १.४.२०१४ पासुन जिल्हा परीषद सिंचन विभागाच्या कामा करीता लागु करण्या लागु करणेस ही सभा मान्यता प्रदान करते.**

**ठरावावर कोणतीही उपसूचना आली नाही. ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेवर येणारे विषय**

**विषय क्रं.५:- जिल्हा ग्राम विकास निधी माहे मे - २०१४ मध्ये झालेल्या जमा खर्चास मंजुरात देणेबाबत.**

विषयाची माहिती उप मु.का.अ.(पं.) यांनी सभेत दिली. जिल्हा ग्राम विकास निधीच्या जमा खर्चास महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १३६ अन्वये स्थायी समितीची मंजूरात घेणे आवश्यक आहे. माहे मे-२०१४ पर्यंत प्राप्त झालेल्या जमा खर्चाचे विवरण मंजूरीकरीता खालीलप्रमाणे सादर करण्यांत येत आहे. कृपया प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात यावी ही विनंती. त्यावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर हेड करिता वरिष्ठ सहायक लेखा चे १ पद शासनाकडून मंजुर आहे व आता सदरचे पद भरण्यात येणार आहे त्यामुळे उक्त विषयाच्या अडचणी दूर होतील. करिता सभागृहाने मान्यता द्यावी असे सांगीतले. सदर विषयावर चर्चा होऊन मा. सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष, जि.प.यवतमाळ यांनी खालीलप्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र.७ :- मुंबई ग्रा.प.अधिनियम १९५८ चे कलम १३६ अन्वये जि.ग्रा.वि.निधी माहे मे- २०१४ मध्ये झालेल्या जमा खर्चास ही सभा खालील प्रमाणे मंजुरी प्रदान करते.**

| | | |
|---|---|---|
| १ | महिण्यातील सुरवातीची शिल्लक | **९,९८,२४,८४०.४१** |
| २ | महिण्यातील जमा | **१,०५,६९५.००** |
| ३ | एकूण जमा रक्कम रुपये | **९,९९,३०,५३५.४१** |
| ४ | महिण्यात झालेला खर्च रक्कम रुपये | - |
| ५ | महिना अखेर शिल्लक रक्कम रुपये | **९,९९,३०,५३५.४१** |

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्रं ६:- ग्रामपंचायत गांजेगाव ता. उमरखेड यांनी दिनांक ३०/०९/२०१३ रोजी पारीत केलेला ठराव क्रमांक ६/१ महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४२ नुसार रद्द करणे अथवा स्थगित करणे बाबत.**

विषयाची माहिती उप मु.का.अ. (पंचा.) यांनी सभेत दिली. श्री. सदाशिव दिगांबर पिंपरखेडे रा. गांजेगाव पो. ब्राम्हणगाव ता. उमरखेड जिल्हा यवतमाळ येथील रहिवासी असल्याचे नमूद करुन ग्रामपंचायत गांजेगाव ता. उमरखेड येथील दिनांक ३०/०९/२०१३ रोजी मासिक सभेचा ठराव क्रमांक ६/१ पुर्णतः बेकायदेशीर, चुकीच्या व त्यामुळे शांतता भंग होण्याचा संभव असल्यामुळे रद्द करण्या बाबत महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४२ नुसार अर्ज दाखल केलेला आहे.

ग्रामपंचायत गांजेगाव शेत सर्व्हे नं.४१३,१४ व १७२ या शेतजमीन १९६६ ला महाराष्ट्र शासनाकडून हस्तांतरीत झाल्या असून सदर शेतजमीनीवर ग्रामपंचातीचे नियंत्रण आहे. गैरअर्जदार श्री. दिगांबर माधव दिवसे राहणार गांजेगाव पो. ब्राम्हणगाव ता. उमरखेड जि. यवतमाळ ने राजकीय वैमनस्यातुन प्रेरीत होवुन व गावामधील शांतता भंग करण्याचे अप्रामाणीक उद्देशाने दिनांक ३०/०९/२०१३ रोजी ग्रामपंचायतीकडे पुर्णतः खोटयात शिरुन बनावटपणे अर्ज सादर केला, त्याची शहानिशा न करता ग्रामपंचायती सोबतचे हितसंबंध लक्षात घेवून गैर अर्जदार सरपंच ग्रामपंचायत गांजेगाव ता. उमरखेड यांनी दिनांक ३०/०९/२०१३ रोजी ठराव क्रमांक६/१ नुसार शासकीय मालकीचा ई वर्ग शेतसर्व्हे नं. ४१३ ची मोजणी करण्याचा ठराव पारीत केला.

श्री. सदाशिव दिगांबर पिंपरखेडे रा. गांजेगाव पो. ब्राम्हणगाव ता. उमरखेड जिल्हा यवतमाळ याने दि. ३० /०९ /२०१३ रोजी ग्रामपंचायतीचे सभेपुर्वी सर्व गावठाण व सर्व शासकीय शेतजमीन शेत सर्व्हे नं. १४, १७२ व ४१३ इत्यादीचे मोजमाप करुन संपूर्ण अतिक्रमण हटविण्याबाबत अर्ज सादर केला. परंतु गैरअर्जदार श्री. दिगांबर माधव दिवसे रा. गांजेगाव पो. ब्राम्हणगाव ता. उमरखेड जि. यवतमाळ चे गैरअर्जदार सरपंच, ग्रामपंचायत गांजेगाव ता. उमरखेड. सोबत हितसंबंध असल्यामुळे त्याचे अर्जाची दखल घेवून बेकायदेशीर ठराव पारीत केला. श्री. सदाशिव दिगांबर पिंपरखेडे रा. गांजेगाव पो. ब्राम्हणगाव ता. उमरखेड जिल्हा यवतमाळ अर्जावर साधी चर्चा सुध्दा न करता, श्री. सदाशिव दिगांबर पिंपरखेडे रा. गांजेगाव पो. ब्राम्हणगाव ता. उमरखेड जिल्हा यवतमाळ चे अर्जाला केराची टोपली दाखवीली. यावरुन स्पष्ट होते की, गैरअर्जदार श्री.दिगांबर माधव दिवसे रा. गांजेगाव पो. ब्राम्हणगाव ता. उमरखेड जि. यवतमाळ चे हितसंबंध लक्षात घेवून त्याचे वतीने ग्रा. पं. पुर्णतः चुकीचे व बेकायदेशीर कृत्य केले आहे.

श्री. सदाशिव दिगांबर पिंपरखेडे रा. गांजेगाव पो. ब्राम्हणगाव ता. उमरखेड जिल्हा यवतमाळ संपूर्ण शासकीय जमीनीवर असलेल्या अतिक्रमणा संबंधाने दि. २५/१०/२०१२, दि. ३०/०९/२०१३, दि. ०४/१०/२०१३ व दि. ०९/१२/२०१३ रोजी ग्रामपंचायतीकडे वेळोवेळी अर्ज सादर केले. परंतु श्री. सदाशिव दिगांबर पिंपरखेडे रा. गांजेगाव पो. ब्राम्हणगाव ता. उमरखेड जिल्हा यवतमाळ चे गैरअर्जदार सरपंच, ग्रामपंचायत गांजेगाव ता. उमरखेड.सोबत राजकीय मतभेद असल्यामुळे सुडबुध्दीने प्रेरीत होवून गैरअर्जदार सरपंच, ग्रामपंचायत गांजेगाव ता. उमरखेड.ने अर्जदाराचे अर्जावर साधी चर्चा सुध्दा न करता, अर्जांना केराची टोपली दाखविली, अशा प्रकारे गैरअर्जदार सरपंच, ग्रामपंचायत गांजेगाव ता. उमरखेड.यांनी अर्जदारावर अन्याय केला आहे.

शासकीय शेत सर्व्हे नं. १४ ई वर्ग क्षेत्रफळ ४ हे. ३ आर हे सन २०१२ - १३ चे सातबारा प्रमाणे ३ हे.२३ आर आहे चराई व ० हे. ८० आर वर हिंदु स्मशानभुमी करीता राखीव आहे. परंतु प्रत्यक्ष मोका पाहणी केली असता सदर जमीनीपैकी काही जमीनीवर गैरअर्जदार गैरअर्जदार श्री. दिगांबर माधव दिवसे रा. गांजेगाव पो. ब्राम्हणगाव ता. उमरखेड जि. यवतमाळ ने व गैरअर्जदार सरपंच, ग्रामपंचायत गांजेगाव ता. उमरखेड. चे हितसंबंधीत व्यक्तीने अतिक्रमण केलेले आहे.

ग्रामपंचायतीला अतिक्रमण काढावयाचे असल्यास शासकीय जमीनीवर असलेले संपूर्ण अतिक्रमण पक्षपाती न करता काढणे कायद्याचे दृष्टीने आवश्यक आहे. परंतु ग्रामपंचायत पक्षपाती करुन त्यांचे समर्थक व हितसंबंधीत लोकांना अतिक्रमण करण्यास एक प्रकारे मदत करीत आहे. सबब सदरचे ग्रामपंचायतीचे कृत्य पुर्णतः कायदेशीररित्या चुकीचे व बेकायदेशीर असल्यामुळे ग्रामपंचायतीने दि. ३०/०९/२०१३ रोजी पारीत केलेला ठराव क्रमांक ६/१ हा पुर्णतः चुकीचा व बेकायदेशीर असुन अन्यायकारक असल्यामुळे रद्द करणे न्यायाचे दृष्टीने अत्यावश्यक आहे.

दिनांक ३० /०९ /२०१३ रोजीचा ठराव बेकायदेशीर व चुकीचा असल्यामुळे दिनांक १३/०३/२०१४ रोजी चार ग्रामपंचायत सदस्यांनी गैरअर्जदार क्रमांक १ यांचेकडे अर्ज सादर केला व शेत सर्व्हे नं. ४१३ ची मोजणी करु नये व मोजणी करीता पैशाचा भरणा करुन नये अशी विनंती अर्ज केला. परंतु त्याचा काही एक विचार न करता, गैरअर्जदार सचिव ग्रामपंचायत गांजेगाव ता. उमरखेड. ने दि. २०/०३/२०१४ रोजी मोजणी करण्याकरीता पैशाचा भरणा केला.

उप अधिक्षक भूमिअभीलेख कार्यालय उमरखेड यांनी दि. २०/०५/२०१४ रोजी शासकीय शेत सर्व्हे नं. ४१३ ची मोजणी बेकायदेशीर ठराव क्रमांक ६/१ नुसार निश्चित केलेली आहे. दि. २०/०५/२०१४ रोजी शेत सर्व्हे नं. ४१३ ची मोजणी झाल्यास गांवामधील शांतता भंग पाडण्याची दाट शक्यता आहे व वातावरण चिघळण्याची शक्यता आहे. त्यामुळे ग्रामपंचायत गांजेगांव यांनी दि. ३०/०९/२०१३ रोजी पारीत केलेला ठराव क्रमांक ६/१ तुर्तास स्थगीत करणे व रद्द करणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असल्याबाबतचे अपील दाखल केले आहे.

त्याअनुषंगाने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडे दिनांक ४/६/२०१४ व दिनांक १७/६/२०१४ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीस अर्जदार , गैरअर्जदार, व गट विकास अधिकारी पं.स. उमरखेड यांचे वतीने विस्तार अधिकारी (पंचायत) उपस्थित होते. अर्जदार, गैरअर्जदार यांची बाजु ऐकुण घेण्यात आली. व प्रकरणी विस्तार अधिकारी ( पंचायत) यांचा लेखी अहवाल घेण्यात आला. यावरुन प्रकरण मा. न्यायाधीश दिवाणी न्यायालय वरीष्ठस्तर, पुसद येथे न्यायप्रविष्ट असल्याचे त्यांचे अहवालात नमुद केले आहे.

तेंव्हा सदरहु प्रकरण जिल्हा परिषदेच्या स्थायी समिती, समोर मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद, यवतमाळ यांचे पूर्वपरवानगीने वेळेवर येणा-या विषयात ठेवण्याचे सविनय सादर. सदहुं विषयावर चर्चा होऊन **मा. सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष जि. प. यवतमाळ** यांनी सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे या सभागृहाला निर्णय घेता येणार नाही असे सांगून उक्त प्रकरणी सुनावणी घेता येईल किंवा कसे याबाबत पंचायत विभागाने पुढील सभेपर्यंत स्पष्ट अभिप्राय द्यावे असे सांगितले.

**विषय क्र. ६:- जि. प. स्थायी समितीची कामांच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

विषयाची माहीती कार्य.अभि. बांध.क्र.१ यांनी सभेत दिली. खाली नमूद केलेल्या कामाकरीता http:/mahatenders.gov.in/nicgep/app या संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द करुन जाहिर निविदा मागविण्यात आल्या होत्या त्या मा. अति मु.का.अ. जि. प. यवतमाळ व कार्यकारी अभियंता जि.प. बांधकाम विभाग क्र. १ यवतमाळ यांच्या डिजीटल ई- स्वाक्षरीने ऑनलाईन पध्दतीने निविदा उघडण्यात आल्या असून त्यात प्राप्त निविदांचे तुलनात्मक विवरण तयार करण्यात येवून स्पर्धात्मकरित्या प्राप्त सर्वात कमी दराच्या निविदा धारकाचा तपशिल खालीलप्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | कामाची अंदाजीत किंमत | प्राप्त निविदाधारकाचे नाव | निविदेतील नमूद दर | सर्वात कमी दराची निविदा | न्युनतम दर असलेल्या निविदाधारकांचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोहदा ता. पांढरकवडा येथे समाज मंदीराचे बांधकाम करणे. | २४८६२० ४ | सी.एल. खुपाट रा. पाटनबोरी | ०.०१% कमी दराने | ०.०१% कमी दराने होणारी निविदेची रक्कम रु. २४८५९५५/- | सी.एल. खुपाट रा. पाटनबोरी |
| २ | मौ. राळेगाव येथे सांस्कृतिक भवन (भाग-२) इमारतीचे बांधकाम करणे ता. राळेगाव. | ४३३६०५ ७ | श्री. साईप्रसाद कंन्सस्ट्रक्शन खैरी | शेडयूल बी दराने | शेडयूल बी दराने होणारी निविदेची रक्कम रु. ४३३६०५७ | श्री. साईप्रसाद कंन्सस्ट्रक्शन खैरी |
| ३ | हुतात्मा स्मारक उमरी ता. बाभुळगाव येथे कंम्पाउंड वालचे बांधकाम करणे. | २९९५६९ ० | रॉन ग्रुप श्री आ. ओ. निमोदीया यवतमाळ | १०.११% कमी दराने | १०.११% कमी दराने होणारी निविदेची रक्कम रु. २६९२८२६/- | रॉन ग्रुप श्री आ. ओ. निमोदीया यवतमाळ |

प्रस्तुत निविदेतील अनुक्रमांक १ ते ३ मध्ये दर्शविलेल्या निविदेची रक्कम स्थायी समिती च्या अधिकार कक्षेत येत असल्यामुळे स्पर्धात्मकरित्या प्राप्त निविदा मधून न्युनतम दराची निविदा वित्त विभागाच्या सहमतीने जि. प. स्थायी समिती सभेपुढे मंजूरी करीता सादर करण्यात येत आहे. कृपया उक्त कामाच्या निविदेस मंजूरी प्रदान करावी हि विनंती. सदर विषयावर चर्चा होउन **मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष, जि.प.यवतमाळ** यांनी खालील प्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्रं.७:-** **का.अ.बांध. क्र. १ यांनी प्रस्तावित केल्यानुसार न्युनतम दर असलेल्या मोहदा ता. पांढरकवडा येथे समाज मंदीराचे बांधकाम करणे. ०.०१% कमी दराने होणारी निविदेची रक्कम रु. २४,८५,९५५/- ची मे. सी.एल. खुपाट रा. पाटनबोरी यांची निविदा , मौ. राळेगाव येथे सांस्कृतिक भवन (भाग-२) इमारतीचे बांधकाम करणे ता. राळेगाव. शेडयूल बी दराने होणारी निविदेची रक्कम रु. ४३,३६,०५७/- ची श्री. साईप्रसाद कंन्सस्ट्रक्शन खैरी यांची निविदा तसेच हुतात्मा स्मारक उमरी ता. बाभुळगाव येथे कंम्पाउंड वालचे बांधकाम करणे. १०.११% कमी दराने होणारी निविदेची रक्कम रु. २६९२८२६ ची रॉन ग्रुप श्री आ. ओ. निमोदीया यवतमाळ यांचे निविदा स्विकृतीस ही सभा मान्यता प्रदान करते.**

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**<u>विषय पत्रिकेवरील विषय संपल्यानंतर खालीलप्रमाणे चर्चा घडुन आली.</u>**

**सन्मा. सदस्य श्री. देवानंद न.पवार** यांनी म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत मॅन्यूअल मस्टर चा निधी यवतमाळ ला देण्यात आला परंतु मजुरीचे वाटप करण्या अगोदर इतिवृत्ताची अट लावण्यात आली आहे ती अट शिथिल करण्यात यावी. तसेच एम.जी.नरेगाचे आयुक्तांनी दिलेले पैसे तात्काळ वाटप करण्यात यावे असे सांगितले.त्यावर **मा.अध्यक्ष** जि.प.यवतमाळ यांनी म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत ३००० अकुशल कामगारांचे व १५८ कुशल कामगारांचे शौचालयाचे बांधकामाचे पैसे अद्याप वाटप झालेले नाही तरी सदर पैसे त्वरीत वाटपाबाबत गट विकास अधिकारी यांनी पंचायत समिती स्तरावर प्रयत्न करावे याबाबतच्या सुचना प.स.स्तरावर देण्यात यावे असे **निर्देश उप.मु.का.अ.(पंचा.) यांना दिले.**

**सन्मा. सदस्य श्री. देवानंद न.पवार** यांनी नविन पंचायत समिती करिता फर्निचरचा पुरवठा करण्यात यावा असे सांगीतले असता **का.अ. बांध.कं. १** यांनी शासनाकडे निधीची मागणी करण्यात आली असून याबाबतचे टेंडर ओपन केले असल्याचे सांगून शासनाच्या मान्यतेसाठी ग्राम विकास विभागाकडे पाठपुरावा करण्यात येतअसल्याचे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. देवानंद न.पवार** यांनी शाळांमधील विद्यार्थ्यांचे गणवेशाबाबत शाळा व्यवस्थापन समितीला अधिकार देण्यात आले आहे. परंतु शाळेतील विद्यार्थ्यांचे गणवेषाचा रंग वेगवेगळा नसावा याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथ.) विभागाने आधीच दक्षता घ्यावी व प्रत्येक पं.स.स्तरावर गणवेश उपलब्ध असावे असे सांगीतले. त्यावर **मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष, जि.प.यवतमाळ** यांनी याबाबत शिक्षण समितीला संपुर्ण अधिकार असल्याचे सांगीतले.